महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## शुध्दीपत्रक
## जाहिरात क्र. ०६/२०२३

१. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीमध्ये सरळसेवा भरती अंतर्गत "विद्युत सहाय्यक" या पदाकरीता माहे डिसेंबर २०२३ मध्ये जाहिरात क्र. ०६/२०२३ प्रसिद्ध करण्यात आली होती. सदर पदाची वस्तुनिष्ठ स्वरूपाची ऑनलाईन क्षमता चाचणी दि. २० ते २२ मे, २०२५ दरम्यान आयोजित केलेबाबतचे प्रसिद्धीपत्रक कंपनीच्या संकेतस्थळावर दि. २३/०४/२०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात आले आहे.

२. महावितरण प्रसिद्धपत्रक दि. २९/०४/२०२५ मध्ये अ.क्र. २ अन्वये परीक्षेचे स्वरूप प्रसिद्ध करण्यात आले होते. आता, परीक्षेचे सुधारीत स्वरूप खालीलप्रमाणे वाचण्यात यावे. :-

| अ.क्र. (Sr.No.) | विषय (Name of Test) | प्रश्नांची संख्या (No. of. Question) | गुण (Max Marks) | परीक्षेची भाषा (Version) | परीक्षेचा एकूण कालावधी (Duration) |
|---|---|---|---|---|---|
| १. | तांत्रिक व्यवसायातील विषयाचे ज्ञान (Professional Knowledge) | २५ | ५५ | द्विभाषिक: मराठी व इंग्रजी (Bilingual i.e Marathi & English) | ७५ मिनिटे |
| २. | तर्कशक्ती (Reasoning) | २० | १० | | |
| ३. | संख्यात्मक अभियोग्यता (Quantitative Aptitude) | १५ | ७.५ | | |
| ४. | मराठी भाषा (Marathi Language) | १५ | ७.५ | | |
| **एकुण** | | **७५** | **८०** | | |

**टिप:** मुळ जाहिरातीनुसार संबंधित परीक्षामधील (Name of Test) प्रश्नांची संख्या व त्यांचे गुण यामधील तुलनात्मक गुणांचे प्रमाण (weightage) हे उक्त सुधारीत परीक्षेच्या स्वरूपामध्ये अबाधित ठेवण्यात येत आहे.

३. उमेदवारांनी दिलेल्या प्रत्येक चुकीच्या उत्तरांना दंड (Penalty) असेल, त्यानुसार त्या प्रश्नास विहित असलेल्या एकुण गुणांच्या १/४ (०.२५ टक्के) इतके गुण दंड म्हणून प्राप्त गुणांमधून वजा करण्यात येऊन अंतिम गुण ग्राह्य धरण्यात येतील. तथापि, उमेदवाराने एखादा प्रश्नाचे उत्तर न दिल्यास/रिक्त ठेवल्यास अशा प्रश्नांना दंड (Penalty) लागणार नाही.

४. सदर जाहिरातीमध्ये मुद्दा क्र. ७.६ पुढीलप्रमाणे वाचण्यात यावे, "उमेदवारांना ऑनलाईन परीक्षेत एकुण ८० गुणांपैकी प्राप्त गुणांचे रूपांतर ९० गुणांमध्ये करून त्यामध्ये बाह्यस्त्रोत कंत्राटी कामगारांना १० गुणांपैकी अनुभवाप्रमाणे प्राप्त असे एकुण १०० गुणांपैकी प्राप्त गुणांच्या आधारे निवड यादी / निकाल तयार करण्यात येईल. उमेदवारांना शुन्य अथवा त्यापेक्षा कमी गुण प्राप्त होतील अशा उमेदवारांचा निकालाकरीता विचार करण्यात येणार नाही."

५. मूळ जाहिरात क्र. ०६/२०२३ मधील तसेच या जाहिराती संदर्भात यापूर्वी प्रसिद्ध करण्यात आलेल्या प्रसिद्धीपत्रक/ शुद्धीपत्रकातील इतर अटी व शर्ती अबाधीत राहतील.

६. उमेदवारांचे हॉल तिकीट, परीक्षेबाबतच्या मार्गदर्शक सूचना इ. कंपनीच्या संकेतस्थळावर www.mahadiscom.in प्रसिद्ध करण्यात येतील. सबब, उमेदवारांनी कंपनीच्या संकेतस्थळाचे वेळोवेळी अवलोकन करावे, ही विनंती.

**सही/-**

**दिनांक : ०२/०५/२०२५** **सहाय्यक महाव्यवस्थापक (मासं-सेप्र)**